प्रकरण पाचवे

# उपसंहार

प्रकरण पाचवे

# उपसंहार

प्रस्तुत लघुनिबंधामध्ये सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यास केल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात मांडावयाचे आहेत.

सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीचा अभ्यास करत असताना प्रथम कादंबरीची संकल्पना व्याख्या, घटक, प्रकार अशा पद्धतीने कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा सर्वबाजूने अभ्यास करुन नंतर स्त्रीलिखित मराठी कादंबरीचा उदय व विकास अभ्यासला आहे.

स्त्रीलिखित मराठी कादंबरीचा अभ्यास करत असताना प्रथम मराठी कादंबरीचा आरंभ केव्हा झाला, मराठीमध्ये स्त्रीलिखित मराठी कादंबरीची सुरुवात कशी झाली? याचा आढावा घेतला आहे. अनेक स्त्रियांनी आपल्या समस्या, प्रश्न कादंबरीत मांडलेले दिसतात. स्त्रियांच्या कादंबरी लेखनास सुरुवात झाल्यापासून वेगवेगळी वाटा वळणे घेत अनुभवत स्त्रियांची कादंबरी प्रवाहित राहिली. यामध्ये प्रकर्षाने साळूबाई तांबवेकर, काशीबाई कानिटकर, जानकीबाई देसाई, विभावरी शिरुरकर, मालतीबाई दांडेकर, ज्योत्स्ना देवधर, नयना आचार्य, गौरी देशपांडे, कविता महाजन, मेघना पेठे अशा स्त्री लेखिकांच्या वैविध्यपूर्ण कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे. त्याचे निष्कर्ष सारांशरूपाने पुढीलप्रमाणे पहाता येतील.

१. प्रारंभीच्या काळात इंग्रजीत 'नॉवेल' तर मराठीत 'नावल' असे म्हटले गेलेल्या या प्रकारास मराठीमध्ये बाणभट्टाच्या ग्रंथावरून कादंबरी हे नाव रुढ झाले. हा दीर्घ वाङ्मयप्रकार असला तरी त्याचा आरंभ कथेपासून झाला आहे.

२. कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण निर्मिती व भाषा या प्रमुख घटकांच्या आधारे विशिष्ट दृष्टिकोनाधारे व्यापक भाषिक अवकाश मांडणारी साहित्यकृती म्हणजे कादंबरी होय. एका विस्तृत कथानकाद्वारे जीवनविषयक सखोल तत्त्वदर्शन घडविणे

हा कादंबरीचा मुख्य हेतू असून तेच खरे कादंबरीचे स्वरुपही आहे असे मानावे लागते. स्वाभाविकच कादंबरीद्वारे मानवी जीवनाच्या अथांगाचे दर्शन घडत असते.

३. काळानुरूप कादंबरीचे अनुभवक्षेत्र विस्तारत गेल्याने सामाजिक, कल्पनारम्य, मनोविश्लेषणात्मक, दलित, ग्रामीण, चरित्रपर, राजकीय असे कादंबरीचे प्रकार अस्तित्वात आले. हे प्रकार क्वचित स्वतंत्रपणे तर खूपवेळा एकमेकांत मिसळून प्रकट होतात. हे सर्व प्रकार वर्तमानाला सामोरे जाणारे दिसतात.

४. मराठीमध्ये स्त्रीलिखित पहिली कादंबरी म्हणून 'चंद्रप्रभाविरहवर्णन' (१८७३) या साळूबाई तांबवेकरांच्या कादंबरीची नोंद आढळते. या कादंबरीने स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा पाया रोवल्यानंतर अनेक लेखिका लिहू लागल्या. या लेखिकांचा लेखनामागील दृष्टिकोन प्रामुख्याने अद्‌भूतरम्य व बोधवादी असल्याचा दिसून येतो. या कादंबऱ्या कल्पनाचमत्कृतीपूर्ण असलेल्या दिसून येतात.

५. १८८५ नंतर मात्र अनेक लेखिका लिहू लागल्या. बोधवादाकडून वास्तवाकडे येऊ लागल्या. १९२० पर्यंतच्या कादंबऱ्यांत तत्कालीन आचारविचार, रुढीपरंपरा, मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवन, समस्या यांचे दर्शन घडते. राजेमहाराजांच्या प्रेमकथा, शौर्यकथा जाऊन त्या ठिकाणी बालविवाहाची समस्या, विधवांच्या पुनर्विवाहाची आवश्यकता हे विषय मांडले आहेत.

६. १९२० ते १९४७ हा कालखंड 'फडके-खांडेकर युग' म्हणून ओळखला जातो. स्वप्नरंजनवादी व कलावादी लेखनाचा प्रभाव स्त्रियांच्या कादंबऱ्यांवर पडलेला दिसतो. मात्र या कालखंडात विभावरी शिरूरकर व गीता साने यांचा विशेषत्वाने उल्लेख केला जातो. विभावरी शिरूरकरांच्या 'हिंदोळ्यावर' या समस्याप्रधान कादंबरीने तत्कालीन समाजात खळबळ माजवली. तसेच त्यांनी या कादंबरीत समाजव्यवस्थेविरूद्ध आवाज उठविणाऱ्या स्त्रियांचे चित्रण केले आहे.

७. १९२० नंतरच्या कादंबऱ्यांमध्ये सखोल अनुभूती, विषयांची विविधता, डोळस अभिव्यक्ती, वस्तुस्थितीचे प्रभावी चित्रणं हे स्त्रियांच्या लेखनात दिसून येते. जे स्त्रियांनी भोगले, अनुभ्वले, जे पाहिले ते सत्य त्यांनी कादंबऱ्यांतून मांडले आहे.

त्यांनी स्वत:च्या चुकांचे आत्मपरीक्षण केल्याने लेखनात कठोरता आलेली दिसते. १९२० नंतरच्या लेखिकांच्या लेखनात सफाईदारपणा दिसून येतो.

८. १९५० नंतरच्या कालखंडात दुसऱ्या महायुद्धाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम, लोकांचा शहराकडे जाण्याचा ओघ, पाश्चिमात्य वाङ्मयाचा परिचय, यांत्रिकीकरणाची सुरुवात या व्यापक समस्यांचा वेध लेखिकांनी न घेता घर, मुले, पती, कुटुंबाभोवतीच त्यांची कादंबरी फिरत राहिलेली दिसते.

९. १९७५ हे साल 'आंतरराष्ट्रीय स्त्री-वर्ष' म्हणून साजरे केले असल्याने त्याचा परिणाम १९७५ नंतरच्या साहित्यावर झाला म्हणावयास हरकत नाही. स्त्रियांच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव करून देणारे विचार स्त्रियांकडून प्रकर्षाने मांडले गेलेले दिसतात. काळ बदलल्याने त्याच्या विचारात प्रगल्भता आली. त्यामुळे ऐतिहासिक, रंजनवादी, स्त्रीवादी, अस्तित्ववादी, चरित्रात्मक, संज्ञाप्रवाही अशा विविध प्रकारच्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

१०. १९८५ नंतरच्या कालखंडात नातेसंबंधावर व कौटुंबिकसंबंधावर कादंबरीलेखन झालेले पहावयास मिळते. आधुनिक सोई-सुविधांचा पुरेपूर वापर त्यांनी करून घेतला व जो मोकळा वेळ मिळाला त्या वेळेत 'स्व'शी प्रामाणिक राहून 'स्व'चा शोध घेणाऱ्या कादंबऱ्या लिहिलेल्या दिसतात. पारंपरिक चौकट मोडून स्त्रीनिष्ट अनुभव व्यक्त केलेले दिसतात.

११. कविता महाजन, आशा बगे, सुरेखा शहा, प्रतिमा इंगोले, मेघना पेठे अशा आजच्या स्त्रिया कादंबरी लेखन करताना दिसतात. कोणतेच बंधन न पाळता स्त्रियांकडे सहानुभूतीच्यादृष्टीने अथवा भोगवस्तू म्हणून न बघता, माणूस म्हणून तिचे असलेले अस्तित्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न लेखिका करत आहेत.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार स्त्रियांनी विपुलतेने हाताळलेला दिसतो. १८७३ पासून स्त्रियांनी कादंबरी लेखन केले असले तरी त्यामध्ये स्त्री चित्रण केंद्रस्थानी नव्हते. नंतर मात्र हळूहळू स्त्रियांचे अनुभव, समस्या केंद्रस्थानी येऊ लागलेल्या दिसतात. स्त्रियांचे अनुभवविश्व अधिक व्यापक होऊ लागले. त्यामुळे स्त्रियांचे कादंबरीलेखनही स्त्री

सुधारणेकडून स्त्री स्वातंत्र्याकडे जाताना दिसते. यामध्ये सुरेखा शहा यांचे योगदान उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. त्यामुळे सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीची आशयसूत्रे साररूपाने पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१. सुरेखा शहा यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९४० साली गुलबर्ग्याजवळील आळंद या छोट्याशा खेडेगावात, जैन गुजराथी घराण्यात झाला. कथा, कादंबरी, एकांकिका, कविता, ललित लेख असे विविध साहित्य प्रसिद्ध आहे. यामध्ये 'जोहड' ही कादंबरी अनेक पुरस्कारांनी गौरविलेली आहे.

२. सुरेखा शहा यांच्या 'जोहड'मधील ठळक स्वरूपात दिसून येणारे आशयसूत्र म्हणजे 'पाणीप्रश्नाची यशस्वी सोडवणूक' हे होय. राजस्थानमध्ये पाण्याची कमतरता भासत असल्यामुळे पूर्वजांनी पाण्यासाठी बांधलेले जोहड काही वर्षांनी दगड-मातीने झाकून जातात. सुरू होते पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती. तरुण कामासाठी शहरात जातात. जमिनीत पीक येत नाही. स्त्रियांची व वृद्धांची जगण्यासाठी धडपड सुरू असते. राजेंद्रसिंह या तरुणाच्या जागृतीतून पाणीप्रश्नाची सोडवणूक होते. दगड-मातीने झाकून गेलेले जोहड दुरुस्त होतात. नवे जोहड तयार केले जातात. राजस्थानच्या खेड्यात पाण्याचे स्त्रोत तयार होतात. हरितक्रांतीला आरंभ होतो याचे दर्शन या कादंबरीत घडते.

३. 'जोहड' मधील 'जंगलरक्षणाची चळवळ' हे दुसरे आशयसूत्र दिसून येते. जंगल ही राष्ट्राची संपत्ती असते. परंतु मानवाच्या हव्यासामुळे जंगलतोड होते, वन्यप्राण्यांची शिकार होते, खाणकामामुळे निसर्ग धोक्यात येतो. आदिवासी, वनवासी ग्रामस्थांमधून जंगलरक्षणाची चळवळ सुरु होते. संघर्ष व आंदोलने करुन जंगलाचे रक्षण होते भकास असणारी जंगले या चळवळीमुळे हिरवी होतात, हे या कादंबरीत दिसून येते.

४. 'पर्यावरणाचे रक्षण' हे आशयसूत्र 'जोहड' मध्ये आढळते. यात वाढते खाणीचे प्रमाण, बेसुमार जंगलतोडीमुळे जंगलाचे होणारे नुकसान, वाघासारख्या प्राण्यांची चाललेली शिकार या सर्वांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. सर्वांना पर्यावरण

रक्षणाची माहिती मिळण्यासाठी 'अरवली चेतना पदयात्रे'चे आयोजन राजेंद्रसिंह व गावकरी करतात. कुलदैवताप्रमाणे वृक्षदैवतही मानले जाते. याला 'धराडी' असे म्हणतात. वृक्षांचे संवर्धन, जतन व्हावे म्हणून 'धराडी'चे संमेलन भरवले जाते. सरिस्का जंगलात अतिक्रमण करून हॉटेलचे बांधकाम चालू होते. परंतु गावकरी व राजेंद्रसिंह एकत्र येऊन रामपाठाचे आयोजन करतात. त्यामुळे बांधकाम थांबते. यामुळे पर्यावरणाची, प्राण्यांची, वृक्षांची हानी रोखली जाते. पर्यावरणाचे रक्षण राजेंद्रसिंह व गावकरी कशाप्रकारे करतात हे सुरेखा शहांच्या जोहडमधून व्यवस्थितरित्या स्पष्ट होते.

५. 'खाणकामगारांचा प्रश्न' हे आशयसूत्र 'जोहड'मध्ये आढळते. आर्थिक परिस्थितीपुढे व्यक्ती हतबल होतो. आर्थिक परिस्थितीशी तडजोड करण्यासाठी कोणतेही काम करायला तयार होतो. जोहडमध्ये खाणीच्या कामामुळे खाणकामगारांच्या शरीराची प्रतिकारशक्ती संपली की 'टीबी', 'सिलिकोसिस' यासारख्या आजाराने मृत्यू होई. तरुण वयातच म्हातारपण येई. खाणीमुळे अनेक वृक्षांची तोडही होई. हे सर्व खाणमालकांच्या भीतीने आणि पैशासाठी त्यांना करावे लागे. परंतु राजेंद्रसिंहांच्या आगमनाने स्थिती बदलते. खाणमजूर खाणकाम सोडून जोहड बांधून शेती पिकवण्यास सुरुवात करतात. अशा पद्धतीने राजेंद्रसिंह व गावकरी एक होऊन खाणमालकाविरूद्ध लढा देतात.

६. शिक्षणाचा, योजनांचा, उपक्रमांचा गंध नसलेल्या राजस्थानमधील अशिक्षित स्त्रियांना राजेंद्रसिंह दूध डेअरी, बचत गट, मेंढीच्या केसापासून कंबळी, सतरंज्या तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतात. या निरक्षर स्त्रिया हे सर्व हिमतीने चालवतात. सुरेखा शहांनी 'स्त्री जागृती' राजेंद्रसिंह कशा पद्धतीने करतात, स्त्रिया स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला समर्थ कशा बनतात, अशा खंबीर, दृढनिश्चयी स्त्रियांचे चित्रण 'जोहड' मध्ये चित्रित केले आहे.

७. स्वावलंबी हे आशयसूत्र 'जोहड'मध्ये दिसते. राजस्थानमधील पावसाच्या अवकृपेमुळे निष्क्रिय झालेली माणसे, बेसूर-बंजर जमीन, तरुणांनी रोजगारासाठी

शहराकडे घेतलेली धाव, आटलेल्या नद्या, विहिरी हे सर्व पाहिल्यानंतर राजेंद्रसिंह अस्वस्थ होतात व पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जोहड खणतात. जोहड खणल्याने भीषण असणाऱ्या भविष्यात आशेचा किरण दिसू लागला. शेते पिकू लागली. पूर्वी काहीच न पिकणाऱ्या शेतात भरघोस धान्य होऊ लागले. तेथील लोक स्वावलंबी बनले. स्त्रियाही राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने अनेक उपक्रम राबवून स्वत:चा उदरनिर्वाह स्वत: करू लागतात. जिद्दीने, अपार कष्टाने 'स्वावलंबी' झालेले लोक 'जोहड'मध्ये पहावयास मिळतात.

८. मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे समाजात राहणे त्याला आवडते. मानवाला परस्पर सहवासाची अपेक्षा असते. एकाकी जगणाऱ्या माणसाला काही समस्यांचा एकट्याने सामना करता येत नाही. त्यामुळे तो एकमेकांचे सहकार्य घेतो व त्या समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधतो. 'जोहड'मध्ये ही जंगल रक्षणासाठी, जोहड खणण्यासाठी, बेकायदेशीर अनेक कामे थांबविण्यासाठी गावकरी व राजेंद्रसिंह एकत्र आलेले दिसतात. एकत्र येऊन 'एकजुटीने' अनेक प्रश्न सोडवताना दिसतात.

सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीमध्ये वेगवेगळी आशयसूत्रे आढळतात. 'जीवन जगताना करावा लागणारा संघर्ष' प्रत्येक आशयसूत्रात प्रतिबिंबित झालेला दिसतो. 'जोहड'मधील आशयसूत्राप्रमाणेच व्यक्तिरेखाही वेगळ्या जाणवतात. राजेंद्रसिंह या मुख्य व्यक्तिरेखेभोवती इतर व्यक्तिरेखाही चित्रित झालेल्या दिसतात.

१. असामान्य कार्य करणारी व्यक्तिरेखा म्हणून 'जोहड'मधील 'राजेंद्रसिंहां'च्या व्यक्तिरेखेकडे पाहिले जाते. उच्च-श्रीमंत वर्गातील राजेंद्रसिंहांचा निर्धार, अथक परिश्रम, गावकऱ्यांचा संपादलेला विश्वास, कर्तव्याप्रती अविचल निष्ठा, संकटावर मात करण्याचा आत्मविश्वास, अहिंसेचे पालन यातून लेखिकेने नायकाची रेखाटलेली व्यक्तिरेखा संबंध कादंबरीभर विकसित केलेली दिसून येते. त्यांच्या अंगीकरारी बाणा, चिकाटी, ध्येय, आत्मविश्वास, जिद्द, महत्वकांक्षा आहे. आपण दुसऱ्यासाठी काही तरी केले पाहिजे असे ठरवून मनामध्ये यशाची खूणगाठ बांधली.

समाजासाठी काहीतरी करायचे आव्हान स्वीकारले. त्याच्या जीवनाचा महासंग्राम येथे शब्दबद्ध केला आहे.

२. परिस्थितीमुळे हतबल झालेल्या व्यक्तिरेखा सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीत येतात. त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजाही भागल्या जात नाहीत. राजेंद्रसिंहांना जोहडच्या कामात प्रथम मदत करणारी 'कजौडी' हिला अंगभर वस्त्र मिळत नाही की पोटभर अन्नही मिळत नाही. एकवेळ जेवते तर एकवेळ पाणी पिऊन झोपते तर तिचा नवरा 'किशन' याला परगावी कामासाठी जावे लागते. गावी येताना मुलांसाठी काही खरेदी केल्यानंतर बायकोला काही घेण्यासाठी पैसे उरत नाहीत. गवंडीकाम करत असता दुसऱ्या मजल्यावरून खाली कोसळून दोन्ही पाय निकामी झालेला, बायकोच्या जीवावर जगणारा 'माधो'. अशी उदासीन व निष्क्रिय माणसे 'जोहड'मध्ये पहावयास मिळतात.

३. स्त्रिया आज कोणत्याही क्षेत्रात पाठीमागे नाहीत. समाजाने त्यांच्याकडे दुय्यम नजरेने पाहिले तरीही त्या पुरुषांच्या बरोबरीने उभ्या आहेत. 'जोहड'मधील 'दडकी' स्वत:वर जोहड बांधण्याची जबाबदारी घेऊन, राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने व गावकऱ्यांच्या सहकार्याने हिमतीने जोहड तयार करते. गावच्या हिश्श्याचे सर्व पैसे स्वत: भरते. गावात शाळा, रस्ते व्हावेत असे तिला वाटते. अशी आदर्श 'दडकीमाई'. 'जंबुरी' ही तरुणपणीच विधवा झालेली पण हिमतीने एकटीच जगते. 'झुमा' ही पती अपंग असल्याने स्वत: शेतात राबते, स्वत:च्या अब्रूचे स्वत: रक्षण करते. अशी सद्वर्तनी, स्वाभिमानी, करारी 'झुमा' अशा कष्ट करून जगणाऱ्या खंबीर स्त्रियांचे दर्शन जोहडमध्ये घडते.

४. या कादंबरीत संसाराची जबाबदारी स्वत:वर घेणाऱ्या स्त्रिया पहावयास मिळतात. 'रामकली' ही गाई-म्हैशी सांभाळून, दूध विकून संसार सांभाळताना दिसते. 'प्रेमली' ही गाई-म्हैशींची देखभाल करते. धारा काढणे, जळण आणणे, नवऱ्याला कामात मदत करणे अशी कामे करते तर 'रामप्यारी' ही राजेंद्रसिंहांच्या अनेक योजनांचा लाभ घेते. दूध डेअरी, बचत गट यात सक्रिय पुढाकार घेते. 'जयरामची

आई' ही म्हातारी होऊनही आपल्या मुलाच्या कामात मदत करते. तिला सर्व वनौषधी वनस्पतींची माहिती असते.

५. राजेंद्रसिंहांना प्रथम कोणाचीच साथ मिळत नाही तेव्हा 'मांगू पटेल' त्यांच्या पाठीशी उभा राहून वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन करतो. गावचा मुखिया असल्याने गावकऱ्यांनाही मार्गदर्शन करतो. 'रामजी' गावचे हित पाहून गावच्या विकासाच्या कामात मदत करतो. 'जयराम मीणा' हा पुढाकार घेऊन प्राण्यांचे जंगलाचे रक्षण करतो. राजेंद्रसिंह त्याला सहकार्य करतात. 'बन्सीचाचा' अरवरी नदीच्या पात्रात चाललेली मच्छीमारी थांबविण्यासाठी गावकऱ्यांना एकत्र करतात. 'रुढमल मीणा' गावकऱ्यांचे हित पाहून जोहड बांधण्यासाठी आपली पिकाऊ जमीन आनंदाने दान करतो. गावासाठी झटणाऱ्या, गावचा विकास पहाणाऱ्या, गावचे हित पहाणाऱ्या व्यक्तिरेखा जोहडमध्ये पहावयास मिळतात.

६. काही लोक कर्तव्याची जाण ठेवणारे असतात. 'जोहड'मधील 'हरिराम' याच्या शेतात पूर्वी काहीच पिकत नव्हते. परंतु राजेंद्रसिंहांनी जोहड बांधल्यानंतर भरपूर धान्य पिकू लागले. राजेंद्रसिंहांमुळे आपल्याला हे दिवस बघता आले म्हणून तो त्यांना बाजरीचे पोते भेट देतो. 'राधू पटेल' राजेंद्रसिंह भेटले नाहीत म्हणून नाराज होतो व त्यांना भेटायला जातो. त्यांना आपले दैवत मानतो. जोधपूरच्या महाराजा 'गजसिंह' यांच्या भूमीची पाणीटंचाई राजेंद्रसिंहांनी जोहड बांधून दूर केल्याने महाराजा त्यांना आपल्या वाढदिवसाचे निमंत्रण देऊन त्यांना महावस्त्र, सिरपावा, व मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करतात.

७. भविष्यात घडणाऱ्या गोष्टींविषयी माणूस नेहमीच अनभिज्ञ असतो. 'नादानसिंह' कष्टकरी घराण्यातील मुलगा. पण जमीनदाराची वाईट नजर बहिणीवर पडते. तो जमीनदारावर हल्ला करतो. तो मेला असे समजून नादानसिंह पळून जातो व दरोडेखोरांच्या टोळीत सामील होतो. दरोडेखोर बनतो. परंतु राजेंद्रसिंह भेटल्यानंतर त्यांनी समजून सांगितल्यानंतर त्याच्यात परिवर्तन होते. तो सामान्य माणसाप्रमाणे जगू लागतो. याचप्रमाणे 'सुलेमान'ही वाघांची शिकार करून कातडी विकून जीवन

जगणारा. राजेंद्रसिंहांच्या सांगण्यावरून तो बेकायदेशीर काम पूर्णपणे बंद करतो व जंगलाची सर्व जबाबदारी आपल्यावर घेतो.

८. राजेंद्रसिंहांच्या बायकोचे 'मीना' हिचे विचार सर्वसामान्यांसारखे, चार-चौघींसारखे असल्याने राजेंद्रसिंहांना ती प्रथम सामाजिक कार्यात साथ द्यायला नकार देते. परंतु नंतर त्याच्या कार्याची महती समजल्यानंतर त्यांना साथ द्यायला येते. राजेंद्रसिंह घरी नसताना मुलांची सर्व जबाबदारी स्वत: पार पाडते.

९. काही लोक सद्प्रवृत्तीचे असतात तर काही दुष्ट प्रवृत्तीचे. अरवरी नदीत मासे पकडू देत नाही म्हणून दुष्ट अधिकारी नदीत अेंड्रील ओततो. खाणमालकांच्या खाणीची कामे थांबवल्याने खाणमालक राजेंद्रसिंहांवर प्राणघातक हल्ला करतात.

१०. सुरेखा शहांनी या कादंबरीत विविध व्यक्तींची विविध वैशिष्ट्ये चित्रित केली आहेत. व्यक्तींच्या कार्याचा, स्वभावाचा आढावा घेतला आहे.

'जोहड' या कादंबरीची रचना आशयाला व व्यक्तिरेखांना साजेल अशी आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबरीतील रचनाविशेष पुढीलप्रमाणे पहाता येईल.

१. 'जोहड' ही मूलत: चरित कादंबरी असली तरी लेखिका सुरेखा शहा यांनी या कादंबरीला कुठेही चरित्रपर कादंबरीचे स्वरूप येऊ दिले नाही. कादंबरीची सुरुवात त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करणाऱ्या कजौडी पासून केली आहे.

२. सुरेखा शहांनी अलिप्त राहून तटस्थपणे कादंबरीत 'तृतीयपुरुषी निवेदनांचा' वापर करून 'जोहड' ही कादंबरी आकाराला आणली आहे. विविध बारकावे निवेदनात टिपले आहेत. मानवी मनाची गुंतागुंत निवेदनातून स्पष्ट केली आहे. दुष्काळ, पाण्याचा अभाव, उपासमार, कष्ट, जगणे ह्या बाबीही निवेदनातून जिवंत होताना दिसतात.

३. 'जोहड'चा विषय वेगळा असल्याने 'भाषेचा' वैविध्यपूर्ण वापर केला आहे. त्यांनी ओढून-ताणून रचना केलेली नाही तर सहजपणे शब्दांचा वापर केलेला दिसतो. निवेदनासाठी व संवादासाठी प्रमाण भाषेचा वापर केला आहे. पण काही वेळेला

राजस्थानी, हिंदी, इंग्रजी या भाषेचाही वापर एकत्रित आलेला दिसतो. त्यातून त्यांच्या ठिकाणी भाषेची उत्तम जाण असलेली दिसते.

४. आशयाला पुष्टी देणारे 'वातावरण' चित्रित झाले आहे. वातावरणामुळे कादंबरीला कलात्मक रूप धारण झाले आहे. वातावरणातून ग्रामीण, कष्टकरी, दुष्काळी, आदिवासी भाग चित्रित झालेला दिसतो. पर्वताविषयी, जंगलाविषयी तपशीलवार माहिती दिल्यामुळे वातावरणाच्या कलात्मकतेला काहीशा मर्यादा येताना दिसतात. वातावरणामुळे भौगोलिक पार्श्वभूमी प्रतिबिंबित झाली आहे. आजूबाजूच्या परिसरातील बारकावे जसेच्या तसे जिवंत झालेले दिसतात.

५. 'जोहड' या कादंबरीतील 'प्रसंगचित्रण' वास्तवावर आधारित आहेत. लेखिका जेव्हा घटनांचे दर्शन घडविते तेव्हा तो प्रसंग जसाच्या तसा डोळ्यासमोर उभा राहतो. हे सुरेखा शहांच्या लेखनाचे कौशल्य म्हणता येईल. या कादंबरीत चित्रित झालेला महापुराचा प्रसंग, हा प्रसंग लेखिकेने जसाच्या तसा आपल्या शब्द कौशल्याने वाचकाच्या डोळ्यासमोर उभा केला आहे. त्याचप्रमाणे राजेंद्रसिंहांवर झालेला हल्ल्याचा प्रसंग हाही लेखिकेने अगदी मोजक्या शब्दांत चित्रित केला आहे. असे प्रसंग केंद्रस्थानी ठेवून वाचकाचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.

६. 'जोहड' या कादंबरीतील व्यक्तींच्या मनात नेमके काय चालले आहे हे सुरेखा शहांनी संवादातून व्यक्त केले आहे. कादंबरीत घटना अथवा प्रसंगानुसार संवाद आले आहेत. ते अर्थपूर्णही आहेत. सुरेखा शहांनी पात्रांच्या स्वभावाला अनुसरुन, वयपरत्वे, लिंगानुसार विचार करून 'संवाद' लिहिलेले दिसतात. विशिष्ट परिस्थितीचा, घटनेचा, व्यक्तींचा विचार संवादात केलेला दिसतो.

७. 'जोहड'मध्ये राजस्थानमधील अनेक 'लोकगीतांचा' वापरही केलेला दिसतो. ती लोकगीते आनंदाच्या क्षणी म्हणजेच पाऊस पडल्यानंतर, लग्न समारंभाच्या वेळी राजस्थानी लोक म्हणतात.

८. जंगल संरक्षणासाठी सुरेखा शहांनी 'धराडी' सारख्या प्रथांचाही उल्लेख केला आहे. याचबरोबर देवारण्य, वाल, देवबनी, काकडबनी, रखतबनी या प्रथांचाही उल्लेख आहे. यातून 'लोककथां'ची योजना त्यांनी केली आहे.

९. सोप्या, छोट्या सुटसुटीत वाक्यांनी ही कादंबरी आकाराला आलेली दिसते. अशा वाक्यांमुळे वाचकाला अर्थ समजण्यास मदत होते. सर्वसामान्य माणसांना भाषा समजेल अशी आहे. योग्य ठिकाणी 'म्हणी', 'वाक्यप्रचार', 'उपमा' यांचा वापर केलेला दिसतो. त्यामुळे भाषेचा कलात्मक दर्जाही उंचावला आहे.

सुरेखा शहांच्या 'जोहड' या कादंबरीचा अभ्यास केल्यानंतर काही विशेष बाबींची नोंद घेता येते.

१. मराठी कादंबऱ्यामध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्या या घर, कुटुंब, नातेसंबंध या भोवतीच फिरत राहिल्या परंतु सुरेखा शहांनी एका वेगळ्या विषयाला हात घातला आहे. एका असामान्य कार्य करणाऱ्या व्यक्तींचे चरित्र 'जोहड' या कादंबरीमध्ये चित्रित केले आहे.

२. 'जोहड' मध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांकडे अधिक लक्ष दिलेले विशेषत्वाने जाणवते. ग्रामीण, आदिवासी महिला कशाप्रकारे हलाखीचे जीवन जगतात परंतु राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने त्या पूर्णपणे कशा बदलतात याचे दर्शन सुरेखा शहांनी 'जोहड' मधून घडविले आहे.

३. 'जोहड' ही कादंबरी मराठी वाङ्मयात पाणी प्रश्नाची चळवळ राबविणारी, पर्यावरणाचे आंदोलन उभा करणारी, 'जोहड' म्हणजे समृद्धीचे प्रतीक बनविणारी, जंगल रक्षणाचे महत्त्व जोपासणारी, एकजुटीच्या कृतीशीलतेला जगण्याचे फळ देणारी, स्त्रियांच्या मधील आत्मविश्वास जागा करुन, त्यांच्यामधील सर्जकता जागविणारी, राजेंद्रसिंहांसारख्या ध्येयवेड्या, संघर्षशील तरूणाची कहाणी म्हणून नोंदविता येईल.